राज्यातील सागर तटीय जिल्हयांकरिता कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी नियुक्त सनियंत्रण समितीच्या कामाचा आढावा घेण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत.. ..

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक :- एस-३०/२०१८/प्र.क्र.५९२/फ-३**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

दिनांक : १५ डिसेंबर, २०१८.

**पहा :-**

१) मा.उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र. ८७/२००६ मधील दिनांक १७ सप्टेंबर, २०१८ रोजीचा न्यायनिर्णय.

२) विभागाचा शासन निर्णय क्रमांक :- एस-१०/२०१५/अनौ.३०/प्र.क्र. ४६२/फ-३, दि.१६/१०/२०१८

**प्रस्तावना :-**

मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. ८७/२००६ मध्ये दिनांक १७ सप्टेंबर, २०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने, विभागाचा शासन निर्णय क्रमांक :- एस-१०/२०१५/अनौ.३०/प्र.क्र. ४६२/फ-३, दि. १६/१०/२०१८ अन्वये राज्यातील मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या सागरतटीय जिल्हयांकरिता कांदळवनांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली सनियंत्रण समिती गठीत करण्यात आली आहे.

जनहित याचिका क्र. ८७/२००६ मध्ये दिनांक १७ सप्टेंबर, २०१८ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयातील परिच्छेद ८५ (डी) खालील प्रमाणे आहे -

*"As directed under the order dated 6th October, 2005 the Principal Secretaries of (1) Environment, (2) Revenue and (3) Forest Department of the Government of Maharashtra shall be overall in-charge for ensuring total compliance with the directions issued under this Judgment and Order. They will monitor the working of the Committee headed by the Divisional Commissioner;"*

मा.उच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयाच्या अनुषंगाने दि. १७/११/२०१८ रोजी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मा.उच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयानुसार, सनियंत्रण समितीच्या कामाचा आढावा घेण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याचा निर्णय झाला. त्याअनुषंगाने समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. ८७/२००६ मध्ये दिनांक १७ सप्टेंबर, २०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने राज्यातील मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या सागरतटीय जिल्हयांकरिता कांदळवनांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या विभागीय

आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण यांच्या अध्यक्षतेखालील सनियंत्रण समितीच्या कामाचा आढावा घेण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे पदनाम | समितीतील स्थान |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव (महसूल) | अध्यक्ष |
| २ | प्रधान सचिव (पर्यावरण) | सदस्य |
| ३ | सचिव (वने) | सदस्य |
| ४ | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई | सदस्य-सचिव |

उपरोक्त समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहील:-

अ. मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. ८७/२००६ प्रकरणी दिनांक १७ सप्टेंबर, २०१८ रोजी दिलेल्या अंमलबजावणीबाबत विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण यांच्या अध्यक्षतेखालील सनियंत्रण समितीकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा /कामाचा त्रैमासिक आढावा घेणे.

आ. आवश्यकतेनुसार सनियंत्रण समितीस मार्गदर्शन करणे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८१२१५१७४००८८२१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2018.12.15 17:47:25 +05'30'

(वीरेंद्र तिवारी)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रति,

१) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.
४) सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई.
८) अपर मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई.
९) विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण.
१०) आयुक्त, महानगर पालिका बृहन्मुंबई / ठाणे / कल्याण-डोंबिवली / मिरा-भाईदंर/ वसई-विरार / नवी मुंबई / पनवेल/ भिवंडी-निजामपूर / उल्हासनगर.

११) पोलीस आयुक्त, मुंबई / ठाणे/ नवी मुंबई.
१२) जिल्हाधिकारी, मुंबई / मुंबई उपनगर / ठाणे/ रायगड / पालघर / रत्नागिरी / सिंधुदूर्ग.
१३) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रक मंडळ, मुंबई.
१४) मुख्य महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA)
१५) व्यवस्थापकीय संचालक,शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (CIDCO).
१६) व्यवस्थापकीय संचालयक, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (MHADA)
१७) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) यांचे प्रतिनिधी.
१८) सदस्य सचिव, महाराष्ट्र सागर तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA)
१९) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), ठाणे / कोल्हापूर.
२०) जिल्हा पोलीस अधिक्षक, ठाणे (ग्रामीण) / रायगड / पालघर / रत्नागिरी / सिंधुदूर्ग.
२१) उप वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई.
२२) उप वनसंरक्षक, ठाणे, डहाणू, जव्हार, रोहा, अलिबाग, शहापूर, सावंतवाडी.
२३) विभागीय वन अधिकारी, चिपळून स्थित रत्नागिरी.
२४) विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संवर्धन घटक
२४) मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण.
२५) नवी मुंबई एन्व्हारमेंट प्रिझर्वेशन सोसायटी.
२६) बॉम्बे एन्व्हारमेंट ॲक्शन ग्रूप.
२७) वनशक्ती (NGO).
२८) महाराष्ट्र मच्छीमार कृती संघ.
२९) संचालक, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी.